StudySite.org सहाय्यक शिक्षणाधिकारी व तत्सम पदे, म. शि. सेवा, गट-ब StudySite.org

प्रशासन शाखा (चाळणी परीक्षा)

दि. ८ फेब्रु., २००९.

# A

CODE : **AET**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 122881

**प्रश्नपुस्तिका**

**एकूण प्रश्न : 150**

**वेळ : दीड तास** **चाळणी परीक्षा / SCREENING TEST** **एकूण गुण : 150**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

↑ केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचें बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. त्या प्राप्त गुणांतून त्यांनी उत्तरपत्रिकेत चुकीची उत्तरे नमूद केल्याबद्दल गुण वजा केले जाणार नाहीत.**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) ---------------------------------------------------------------> **( कृपया पान उलटवा )**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



StudySite.org

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

## नमुना प्रश्न

**प्रश्न.क्र. 201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदू कोण?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र.क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे कंस पूर्णपणे छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.**

## पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे पृष्ठ उलटू नये

StudySite.org



StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



1. प्रश्नांकित जागी मालिकेतील योग्य अंक निवडा.
6, 12, 21, ?, 48
(1) 38 (2) 40 (3) 45 (4) 33

---

2. त्वरण म्हणजे ________ मधील बदलाचा दर होय.
(1) वेग (2) अंतर (3) चाल (4) विस्थापन

---

3. स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी शेतीचा पहिला प्रयोग कोणत्या राज्यात सुरु झाला ?
(1) महाराष्ट्र (2) उत्तरप्रदेश (3) मध्यप्रदेश (4) पंजाब

---

4. खालील मूलद्रव्यांच्या जोड्यांपैकी कोणती जोडी न्यूलँड्‌जच्या अष्टकाच्या नियमानूसार गुणधर्मामध्ये सारखेपणा दाखवत नाही ?
(1) Li, Na (2) Be, Mg (3) F, Cl (4) S, Fe

---

5. शिक्षक आपल्या दैनंदिन अध्यापनातील समस्या सोडविण्यासाठी कोणत्या संशोधनाचा उपयोग करतील ?
(1) मूलभूत (2) उपयोजित
(3) कृती संशोधन (4) यापैकी कोणतेही नाही

---

6. "भारताचे भवितव्य त्याच्या वर्गावर्गातून घडविले जात आहे". खालीलपैकी कोणत्या आयोगाचे वचन शिक्षणाच्या क्षेत्रात सर्वश्रुत आहे ?
(1) डॉ. राधाकृष्णन (1948 - 1949) (2) मुदलीयार आयोग (1952 - 1953)
(3) हंटर आयोग (1882) (4) भारतीय शिक्षण आयोग (1964 - 1966)

---

7. भूमिकापालन हा ________ एक प्रकार आहे.
(1) अभिरूपतेचा (Simulation) (2) नाट्यीकरणाचा
(3) आदर्श पाठाचा (4) यापैकी नाही.

---

8. प्रौढशिक्षण मिळाल्यानंतर साक्षरता टिकून राहाण्यासाठी ________ केंद्राची स्थापना केली होती.
(1) ग्राम शिक्षण (2) जनशिक्षण निलयम
(3) खडू-फळा (4) स्त्री शिक्षण

---

9. रणगाडा प्रशिक्षण केंद्र ________ येथे आहे.
(1) नाशिक (2) पुणे (3) अहमदनगर (4) औरंगाबाद

---

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**10.** दूधापासून दही होणे ही कोणती प्रक्रिया आहे?

(1) रासायनिक प्रक्रिया (2) भौतिक प्रक्रिया
(3) जैविक प्रक्रिया (4) जैवरासायनिक प्रक्रिया

**11.** सांघिक, शिस्तबद्ध, तालबद्ध शारीरिक हालचाल म्हणजे ________ .

(1) क्षमता (2) कवायत (3) संयम (4) संघटन

**12.** पं. नेहरूंच्या 'Discovery of India' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर ________ यांनी केले.

(1) कुसुमावती देशपांडे (2) साने गुरुजी
(3) बा.सी. मर्ढेकर (4) नारायण सुर्वे

**13.** शिक्षकी पेशाचा दर्जा व प्रतिष्ठा राखण्यासाठी कोणत्या विशिष्ट तत्त्वांची निश्चिती केलेली आहे?

(1) सेवा शर्ती (2) वेतन निश्चिती (3) आचार संहिता (4) नैतिक मूल्य

**14.** 'पुसा सोना' ही विकसित केलेल्या ________ या वनस्पतीची जात आहे.

(1) सूर्यफूल (2) तीन पानी गवत (3) राय गवत (4) मोहरी

**15.** महाराष्ट्रातील बलुतेदार-अलुतेदार या गावकामगारांची कामातील वतनदारी कोणत्या साली कायद्यामुळे नष्ट करण्यात आली.

(1) 1955 (2) 1956 (3) 1957 (4) 1958

**16.** भारतीय संविधानाच्या ________ कलमानुसार सर्वांना धार्मिक स्वतंत्रता आहे.

(1) 28 व्या (2) 45 व्या (3) 38 व्या (4) 46 व्या

**17.** मुंबई बंदरावरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने ________ येथे 'जवाहरलाल नेहरु पोर्ट' हे बंदर आहे.

(1) हल्दिया (2) न्हावा-शेवा (3) मार्मागोवा (4) कांडला

**18.** पर्यावरणातील बदलानुसार सजीवांच्या संरचनेतील किंवा क्रियेतील अनुरूप बदलास ________ असे म्हणतात.

(1) परासरण (2) अनुकूलन (3) प्रकाश संश्लेषण (4) पराग सिंचन

**19.** उदयोन्मुख भारतीय समाजात आजही ________ अस्तित्वात आहे व तो घटक समाज विकासासाठी एक कलंक आहे.

(1) वर्णव्यवस्था, - वर्गव्यवस्था (2) सामाजिक, धार्मिक - परंपरा
(3) जातीव्यवस्था (4) सामाजिक स्तरीकरण

StudySite.org

StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**20.** कोणत्या वयोगटात वाढत्या लोकसंख्येमुळे परावलंबनाची शेकडेवारी अधिक होते ?

(1) जन्मापासून ते 14 वर्षापर्यंत (2) 15 ते 58 वर्षे

(3) 58 वर्षांनतर (4) 15 वर्षाखालील व 58 वर्षावरील

---

**21.** खालीलपैकी कोणता पर्यवेक्षणाचा उद्देश नाही.

(1) शाळांची क्षमता वृद्धिंगत करणे

(2) शाळेच्या कार्यात सुधार करणे

(3) शाळेच्या कारभारातील दोष दूर करण्यासाठी मार्गदर्शन करणे

(4) अध्यापन साहित्याची निर्मिती करणे.

---

**22.** 'शैक्षणिक प्रक्रिया म्हणजे आंतरक्रियेचा विकास' हे मत कोणाचे आहे ?


(1) अरविंद घोष (2) महात्मा गांधी

(3) रविंद्रनाथ टागोर (4) स्वामी विवेकानंद

---

**23.** प्रश्न चिन्हाच्या जागी येणारी आकृती पर्यायातून निवडा.

प्रश्न आकृती पर्यायी आकृती




1 2 3 4

(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार

---

**24.** सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करताना शिक्षकांनी कोणत्या गोष्टीकडे लक्ष द्यावे ?

(1) बौद्धिक विकास व वृत्ती (2) अभिनय व अभिरूची

(3) शैक्षणिक पात्रता व शैक्षणिक विकास (4) शारीरिक विकास व आवड

---

**25.** इतिहास अध्यापनातील तोचतोच – पणा दुर करून अभिरूची पूर्ण अध्यापनासाठी __________ या बालकेंद्रीत अध्यापन पद्धतींचा उपयोग करणे योग्य ठरते.

(1) व्याख्यान, कथन, संगणक (2) कथाकथन, नाट्यीकरण, भूमिका अभिनय

(3) चर्चा, ग्रंथालय, पर्यवेक्षित अभ्यास (4) निवेदन वर्णन, स्पष्टीकरण

---

P.T.O.

StudySite.org StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**26.** मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र कोणते ?

(1) केसरी (2) सुधारक (3) महाराष्ट्र धर्म (4) दर्पण

**27.** संपूर्ण देशभर एकाच वेळी जनगणना ________ पासून सुरु करण्यात आली.

(1) इ.स. 1871 (2) इ.स. 1901 (3) इ.स. 1881 (4) इ.स. 1891

**28.** स्त्रियांना समानच नव्हे तर सन्मानाने स्थान देणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश कोणता ?

(1) चीन (2) रशिया (3) भारत (4) नार्वे

**29.** कार्लमार्क्स हा ________ विचारवंत होता.

(1) रशियन (2) जर्मन (3) फ्रेंच (4) पोलिश

**30.** धनाग्र म्हणजे ________ होय.

(1) बॅटरीचे कोणतेही एक टोक
(2) बॅटरीचे ऋण टोक
(3) धन टोकाला जोडलेले विद्युत अग्र
(4) ऋण टोकाला जोडलेले विद्युत अग्र

**31.** केंद्रीय मंत्रिमंडळ संयुक्तरित्या ________ यांना जबाबदार असते.

(1) लोकसभा (2) राज्यसभा (3) विधानसभा (4) वरील सर्व

**32.** कोणत्या भारतीय महिला हॉकी संघाच्या कॅप्टनच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने जपानचा पराभव करून आशिया कप जिंकला ?

(1) इंदूताई पारीख (2) पुनिता अरोरा (3) शोभना रौनक (4) सूरजा लता देवी

**33.** प्रथम भाषा निबंध लेखनाचे मुद्दे विद्यार्थ्यांना देऊ नयेत कारण ________ .

(1) स्वत: लिहिण्याची सवय लागत नाही.
(2) शुद्धलेखन व हस्ताक्षर सुधारत नाही.
(3) विद्यार्थ्यांची सृजनात्मक लेखन अभिव्यक्ति विकसित होत नाही.
(4) आपली भाषा, मते व वाचलेले लिहू शकत नाही.

**34.** शिक्षण हे सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे ________ आहे.

(1) साधन (2) मूल्य (3) लक्षण (4) वैशिष्ट्य

**35.** काही विशिष्ट परिस्थिती/समस्या निर्माण होण्यापूर्वीच त्याची कल्पना व त्यावरील उपायांची माहिती दिली जाते हा ________ निरीक्षणाचा प्रकार आहे.

(1) क्रियात्मक (2) प्रतिबंधात्मक (3) सुधारणात्मक (4) रचनात्मक

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**36.** __________ च्या शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या चौकटीत सहसमाज कार्य या घटकाचा समावेश केला आहे.

(1) 1987 नवी शिक्षण योजना
(2) N.C.E.R.T. शिक्षक प्रशिक्षण
(3) 1978 च्या N.C.T.E.
(4) राज्य शिक्षण प्रशिक्षण संस्था

---

**37.** मानवाने __________ मुळे संभाषणकला विकसित केली आहे.

(1) अचूक दृष्टी (2) स्वरयंत्र (3) तांबड्या पेशी (4) कवटीची क्षमता

---

**38.** एका आयताकृती कागदाचे बत्तीस समान भाग करायचे असतील, तर त्या कागदाला किती घड्या पाडाव्या लागतील ?

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

---

**39.** सध्या शिक्षणाचा कोणता आकृतीबंध प्रचलित आहे ?

(1) 10 + 2 + 4 (2) 10 + 2 + 3 (3) 4 + 6 + 2 + 3 (4) 8 + 4 + 3

---

**40.** मालिका पूर्ण करा.

2, 8, 18, 32, 50, 72, ?

(1) 96 (2) 98 (3) 102 (4) 114

---

**41.** एन.सी.सी./एन.एस.एस्./वीरबाला/बालवीर पथक इ. कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांना कोणता फायदा होतो ?

(1) व्यक्तिमत्त्वाच्या विविध घटकांचे संघटन होते.
(2) चांगल्या सवयी रूजविता येतात.
(3) अध्ययनात रूची वाढते.
(4) पर्याय 1 अणि 2

StudySite.org

---

**42.** अध्यापन __________ करण्यासाठी अध्ययन साहित्याची गरज असते.

(1) वस्तुनिष्ठ (2) आकर्षक (3) मनोरंजक (4) परिणामकारक

---

**43.** 'राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे' अध्यक्ष कोण आहेत ?

(1) डॉ. सॅम पित्रोदा
(2) डॉ. एम.एस्. स्वामीनाथन
(3) डॉ. पिल्ले
(4) पी. बलराम

---

**44.** खालीलपैकी विसंगत पर्याय ओळखा :

(1) श्री. वेंकटरामन
(2) श्री. फकरूद्दीन अली अहमद
(3) श्री. लाल बहादुर शास्त्री
(4) ज्ञानी झैल सिंघ

---



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



45. मध्यप्रदेशापासून __________ या नवीन राज्याची निर्मिति झाली.
(1) झारखंड (2) छत्तीसगड (3) उत्तरांचल (4) मणिपूर

46. एका सांकेतिक भाषेत ANSWER म्हणजे 241356 व MAD म्हणजे 928 तर REWARD म्हणजे काय?
(1) 656328 (2) 653268 (3) 563286 (4) 632685

47. खालीलपैकी कोणती अक्षरे प्रश्नचिन्हांच्या जागी बसतील?
A, E, I, **?**, **?**
(1) O, Q (2) M, Q (3) M, U (4) O, M

48. समानतेसाठी शिक्षण म्हणजेच शिक्षणाच्या समान संधीचा विस्तारपूर्वक विचार व त्याची अंमलबजावणी __________ नुसार झाली.
(1) राष्ट्रीय शिक्षण धोरण - 1986 (2) विद्यापीठ शिक्षण आयोग - 1948
(3) भारतीय शिक्षण आयोग - 1966 (4) माध्यमिक शिक्षण आयोग - 1953

49. विद्यार्थ्यांचे वर्तन बेशिस्त होऊ नये यासाठी बेशिस्तीस कारणीभूत घटकांचा विचार करून शालेय वातावरण शिस्तबद्ध ठेवणे, हा __________ शिस्तीचा सिद्धांत आहे.
(1) प्रतिबंधात्मक (2) प्रतिकारात्मक (3) प्रतिरक्षणात्मक (4) सुधारणात्मक

50. निबंधवजा प्रश्नांचा मूल्यमापनात कोणता दोष राहतो?
(1) उत्तरे लिहिण्यास वेळ लागतो.
(2) प्रश्नरचना कठीण असते.
(3) उत्तरे तपासण्यात व्यक्तिनिष्ठता फार येते.
(4) वैयक्तिक स्वरूपाचे प्रश्न समाविष्ट असतात.

51. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नेमलेल्या सहाव्या वेतन आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत?
(1) डॉ. मुणगेकर (2) न्या. बी.एन. श्रीकृष्ण
(3) न्या. रंगनाथ मिश्रा (4) न्या. ए.आर. लक्ष्मणन

52. विधान सभेच्या सभासदांची कमाल संख्या किती असते?
(1) 500 (2) 10 (3) 40 (4) 250

53. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मे 1986 च्या धोरणाची वैशिष्ट्ये __________ नावाने प्रचलित आहे.
(1) राष्ट्रीय शिक्षण उद्दीष्टे (2) सर्व शिक्षण अभियान
(3) दहा गाभाभूत घटक (4) सार्वत्रिक सक्तीचे शिक्षण

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



54. विचार प्रक्रियेची प्रतीके ________ ही आहेत.
   (1) स्मरण, विस्मरण, अवलोकन, अध्ययन
   (2) संवेदना, अवबोध, प्रतिमा, कल्पना, संकल्पना
   (3) अभियोग्यता, बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व, ज्ञान, साहचर्य
   (4) बुद्धिगुणांक, विमर्शी चिंतन, समर्थन, प्रक्षेपण, विस्थापन

---

55. भाषा हे ________ चे प्रभावी साधन आहे.
   (1) लिखित साहित्याचे (2) संवाद साधण्याचे
   (3) आत्मप्रकटीकरणाचे (4) व्यक्तिमत्त्व विकासाचे

---

56. खालील गटातील पाहुणा ओळखा.
   पोपट, चिमणी, गाय, कावळा.
   (1) पोपट (2) चिमणी (3) गाय (4) कावळा

---

57. विज्ञान शिक्षकास विज्ञान अध्यापन अधिक परिणामकारक करण्यासाठी ________ चा सदस्य बनने आवश्यक आहे.
   (1) भूगोल मंडळ (2) खगोल मंडळ (3) भाषा मंडळ (4) विज्ञान मंडळ

---

58. पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार मंत्रिमंडळांची नेमणूक कोण करतो ?
   (1) राष्ट्रपती (2) राज्यपाल
   (3) उपराष्ट्रपती (4) लोकसभा सभापती

---

59. ''सुरेश बोर्डाच्या परीक्षेत अपयशी झाला, शिक्षकांनी पेपर कडक तपासले'', असे म्हणतो हे कशाचे उदाहरण आहे ?
   (1) विस्थापन (2) उदात्तीकरण (3) दमन (4) प्रक्षेपण

---

60. शाळा तपासण्याचे काम ________ .
   (1) केवळ शिक्षणाधिकाऱ्याने करावयाचे असते.
   (2) शिक्षणाधिकाऱ्याने सोबत अनुभवी शिक्षक व मुख्याध्यापकांना पाचारण करून करावयाचे असते.
   (3) शिक्षणाधिकाऱ्याने बँकेच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन करावयाचे असते.
   (4) शिक्षणाधिकाऱ्याने पसंतीच्या व्यक्तींना सोबत घेऊन करावयाचे असते.

---

61. 'वाईज अँड अदरवाईज' या पुस्तकाच्या लेखिका कोण ?
   (1) रंजना सपकाळ (2) शीला दिक्षीत (3) सुधा मूर्ती (4) झूलन गोस्वामी

---

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



62. दैनंदिन जीवनात __________ या गणित शाखेचा जेवढा उपयोग होतो तेवढा इतर शाखांचा होत नाही :
(1) बीजगणित (2) भूमिती (3) अंकगणित (4) शेकडेवारी

63. मूल्यमापन प्रक्रियेचे उद्दिष्ट कोणते ?
(1) विद्यार्थ्यांच्या आकलन पातळीची तपासणी करणे.
(2) जे-जे ऐकले, वाचले त्याची पुनरावृत्ती करणे.
(3) विद्यार्थ्यांची आयत्यावेळी परीक्षा घेणे.
(4) विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या माहितीची पातळी तपासणे.

64. 'कौस्तुभ' माहितीचे विश्लेषण करतो, तपासून पाहतो, अर्थ काढतो त्यावरून निष्कर्ष वा अनुमान काढतो यावरून त्याचा कोणता गुण दिसून येतो ?
(1) विज्ञानावर विश्वास (2) माहितीवर विश्वास
(3) प्रयोगावर विश्वास (4) तर्कावर विश्वास

65. कार्यानुभव म्हणजे __________ होय.
(1) प्रत्यक्ष कामाचा अनुभव (2) काही वस्तूंचे उत्पादन करणे
(3) माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे (4) वरीलपैकी सर्व

66. समान आकारमानाच्या व एकाच प्रकारच्या द्रव्याने बनलेल्या पदार्थाचे वस्तुमान सारखे असते या गुणधर्माचा उपयोग करून एक पदार्थ दुसऱ्या पदार्थापेक्षा हलका की जड हे ठरविले जाते यास शास्त्रीय भाषेत __________ असे म्हणतात.
(1) वजन (2) दाब (3) तापमान (4) घनता

67. शैक्षणिक साधनांचा अध्ययनाच्या परिणामकारकतेचा विचार करून __________ या शिक्षणतज्ञाने अनुभव शंकू कल्पिला आहे.
(1) डॉ. ॲलन (2) डॉ. पासी (3) एडगर डेल (4) रिचर्ड सचमन

68. मुलांच्या सुप्त शक्तिंचा विकास करून त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांगाने विकसित करणारी __________ ही अनौपचारिक संस्था आहे.
(1) कुटुंब संस्था (2) धर्म संस्था
(3) स्वयंसेवी संस्था (4) शाळा शिक्षण संस्था

69. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना कोणासमोर शपथ घ्यावी लागते ?
(1) मुख्यमंत्री (2) राष्ट्रपती (3) राज्यपाल (4) सरन्यायाधीश

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**70.** सन् 2001 - 2002 मध्ये महाराष्ट्र शासनाने जलसिंचनासाठी कोणत्या योजनेचा पुरस्कार केला आहे?

(1) नालाबंडिंग पद्धती
(2) घराच्या छपरावरील पावसाच्या पाण्याचा साठा
(3) शिवशाही पाणीपुरवठा योजना
(4) पाणी अडवा-पाणी जिरवा

**71.** पठारावस्था खालील कोणत्या कारणांमुळे घडून येते?

(1) विषय आवडीचा नसतो.
(2) शिक्षकाचे अध्यापन कंटाळवाणे असते.
(3) विद्यार्थ्यांना थकवा किंवा कंटाळा आलेला असतो.
(4) वरील सर्व.

**72.** सामाजिक मार्गदर्शनात ________ द्वारे गटातील निरनिराळ्या व्यक्तिंचे परस्पर संबंध स्पष्टपणे लक्षात येऊ शकतात.

(1) व्यक्तिवृत्तांत
(2) समाज निरीक्षण
(3) समाजमिती आलेख
(4) मानसिक कसोट्या

**73.** तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून शिक्षणाचे प्रमुख कार्य म्हणजे ________ .

(1) ज्ञानाविषयी योग्य अभिरूची विकसित करणे
(2) ज्ञानाचा प्रकाश पसरविणे
(3) संस्कृती संरक्षणासाठी मार्गदर्शन करणे
(4) ध्येये आणि मार्गदर्शक तत्त्वे पुरविणे

**74.** सहा मुले वर्तुळाच्या केंद्राकडे तोंड करुन वर्तुळाकार बसले आहेत. राजीव मोहनच्या उजवीकडे आहे पण विजयच्या डावीकडे नाही. चंदर हा बाबू व विजयच्या मध्ये आहे. विजय अजयच्या डाव्या बाजूस आहे. जर विजय व मोहनने आपल्या जागांची अदलाबदल केली तर अजय व चंदरच्या मध्ये कोण येईल?

(1) अजय (2) विजय (3) मोहन (4) बाबू

**75.** प्रश्नचिन्ह असलेल्या ठिकाणी योग्य पर्याय ओळखा?

| | | |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 5 | 5 | 5 |
| 36 | ? | 64 |

(1) 42 (2) 94 (3) 49 (4) 09

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**76.** महाराष्ट्रात विविध प्रकारची फळे पिकविण्यात कोणत्या जिल्ह्याचा पहिला क्रमांक लागतो ?

(1) औरंगाबाद (2) अहमदनगर (3) अमरावती (4) अकोला

**77.** 2008 या वर्षी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठाचे कुलगुरू कोण होते ?

(1) डॉ. राजेन्द्र वडनेरे (2) डॉ. राजन वेळूकर

(3) डॉ. पंडित पलांडे (4) डॉ. अनंत जोशी

**78.** घटनेच्या कोणत्या कलमानुसार प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे :

(1) 35 (2) 45 (3) 55 (4) 56

**79.** तालुका पंचायत समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी कोण ?

(1) सभापती (2) गटविकास अधिकारी

(3) गटशिक्षणाधिकारी (4) तहसिलदार

**80.** प्रशिक्षित बेरोजगार तरूण-तरूणींना रोजगार व स्वंय-रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने सुरू केलेल्या बेबसाइटचे नाव काय ?

(1) http://ycmou.nic.in (2) http://ens.mah.nic.in

(3) http://ese.mah.nic.in (4) http://egs.mah.nic.in

StudySite.org

**81.** त्रिभाषा सूत्रामध्ये कोणत्या भाषांचा समावेश होतो ?

(1) मराठी, हिंदी, इंग्रजी.

(2) हिंदी, इंग्रजी, गुजराती.

(3) प्रादेशिक भाषा (मातृभाषा), राज्यभाषा, आंतरराष्ट्रीय भाषा.

(4) कन्नड, हिंदी, गुजराती.

**82.** खालीलपैकी कोणती संख्या संख्या मालिकेत अचूक बसेल ?

10, 29, 66, 127, 218, **?**

(1) 337 (2) 341 (3) 343 (4) 345

**83.** 2007 या वर्षी भारताचे रेल्वेमंत्री कोण होते ?

(1) श्री. पी. चिदंबरम् (2) श्री. सोमनाथ चॅटर्जी

(3) श्री. नीतिशकुमार (4) श्री. लालूप्रसाद यादव

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**84.** शालेय शिक्षण कायद्यानुसार शाळांना पहिल्यावेळी मान्यता देण्याचा अधिकार ________ यांना आहे.

(1) उपसंचालक (2) शिक्षणाधिकारी

(3) शिक्षण निरीक्षक (4) तंत्र शिक्षण उपसंचालक

---

**85.** एका त्रिकोणाच्या बाजू 9, 12, 15 सें.मी. आहेत तर त्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ किती ?

(1) 54 चौ.सें.मी. (2) 108 चौ.सें.मी. (3) 135 चौ.सें.मी. (4) 90 चौ.सें.मी.

---

**86.** राज्याचे अंदाजपत्रक कोणत्या सभागृहात मांडले जाते ?

(1) मंत्रिमंडळ (2) विधानसभा (3) विधान परिषद (4) लोकसभा

---

**87.** 'पाणी अडवा-पाणी जिरवा' या घोषणे नुसार ती योजना ________ जिल्ह्यात प्रथम राबविण्यात आली.

(1) पुणे (2) अहमदनगर (3) जळगाव (4) औरंगाबाद

---


**88.** पाश्चातीकरण म्हणजे सामाजिक अनुकरण तर आधुनिकीकरण म्हणजे काय ?

(1) सामाजिक सांस्कृतिकीकरण (2) सामाजिक क्रांती

(3) सामाजिक अभिसरण (4) सामाजिक विवर्धन

---

**89.** खालील आकृतीमध्ये जास्तीतजास्त त्रिकोण किती आहेत ?




(1) 5 (2) 7 (3) 9 (4) 10

---

**90.** तालुका पातळीवरील शैक्षणिक प्रशासनाचे प्रमुख म्हणून ________ असतात.

(1) तालुका मास्तर (2) गटशिक्षणाधिकारी

(3) गटविकासाधिकारी (4) शिक्षणविस्तार अधिकारी

---



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**91.** राज्य घटनेतील 1 ते 4 कलमांमध्ये काय सांगितले आहे?

(1) मूलभूत हक्क (2) राज्य व केंद्रशासित प्रदेशांची यादी

(3) नागरिकत्व (4) मार्गदर्शक तत्वे

---

**92.** __________ विद्यापीठे ही धार्मिक, नैतिक व ऐहिक शिक्षणासाठी पूर्वी पासून प्रसिद्ध आहेत.

(1) 'रामेश्वर अध्यात्म शिक्षण विद्यापीठ', रामेश्वर

(2) 'धार्मिक व नैतिक शिक्षण विद्यापीठ', पुणे

(3) नालंदा, तक्षशीला, कांची, काशी विद्यापीठ

(4) कपिलतीर्थ अध्यात्म विश्व विद्यापीठ

---

**93.** व्यक्ति ज्या कारकांमुळे कृती करण्यास प्रवृत्त होते त्यास __________ असे म्हणतात.

(1) प्रयत्न (2) प्रेरक (3) सवय (4) वृत्ती

---

**94.** एखादे विशिष्ट उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन ते पूर्ण करण्यासाठी जे नियोजन केले जाते त्याला काय म्हणतात?

(1) आंशिक नियोजन (2) संरचनात्मक नियोजन

(3) वित्तीय नियोजन (4) कार्यात्मक नियोजन

---

**95.** नैसर्गिक परिस्थितीत पूर्णतेस नेलेल्या समस्याप्रधान कृतीस काय म्हणतात?

(1) स्वयंशोधन (2) प्रयोग

(3) प्रकल्प (4) यापैकी कोणतेही नाही

---

**96.** "मराठी भाषा लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषा लेखन करणे अवघड वाटत नाही" हा अध्ययन संक्रमणाचा कोणता प्रकार आहे?

(1) ऋण संक्रमण (2) निरीक्षणात्मक संक्रमण

(3) धन संक्रमण (4) शून्य संक्रमण

---

**97.** वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेणारे पहिले सत्याग्रही कोण होते?

(1) पं. जवाहरलाल नेहरु (2) नेताजी सुभाषचंद्र बोस

(3) आचार्य विनोबा भावे (4) एस्.एम्. जोशी

---

**98.** मानवाने बनविलेले पहिले दगडी हत्यार __________ हे होय.

(1) तासणी (2) हात कुऱ्हाड (3) भाला (4) परशु

---

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**99.** वाझीर कमिशन हे कोणत्या राज्याच्या संबंधी आहे?

(1) बिहार (2) महाराष्ट्र (3) उत्तर प्रदेश (4) जम्मू आणि काश्मिर

---

**100.** __________ तत्वज्ञानानुसार वाचन, प्रच्छना, अनुत्प्रेक्षा, आम्नाय आणि धर्मोपदेश या अध्ययनाच्या पायऱ्या आहेत.

(1) बौद्ध (2) वेदांत (3) जैन (4) सांख्य

---

**101.** मराठीच्या वाचनात गोडी निर्माण करण्यासाठी खालीलपैकी कोणता उपक्रम सर्वात प्रभावी ठरेल?

(1) मराठी वाचनाचे महत्त्व स्पष्ट करणे.

(2) ग्रंथ महोत्सवाचे महत्त्व सांगणे.

(3) विद्यार्थ्यांना गोष्टींची पुस्तके वाचावयास देणे.

(4) 2 व 3 दोन्हीही.

---

**102.** औद्योगिक क्रांती प्रथम __________ घडून आली.

(1) अमेरिकेमध्ये (2) इंग्लडमध्ये (3) रशियामध्ये (4) भारतामध्ये

---

**103.** खालीलपैकी सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्ट कोणते नाही?

(1) इ.स. 2010 पूर्वी सर्व मुलांना 8 वर्षाचे प्राथमिक शालेय शिक्षण देणे.

(2) समाधानकारक दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर तसेच जीवनासाठी शिक्षणावर भर देणे.

(3) इ.स. 2010 पर्यंत सर्व मुला-मुलींना शाळेत टिकवून ठेवणे.

(4) ग्रामशिक्षण समिती सदस्यांच्या उपस्थितीत उपस्थिती, 'भत्त्याचे वाटप' करणे.

---

**104.** पाठाचा प्रारंभ, फलक लेखन, स्पष्टीकरण, प्रबलन, चेतक बदल ही __________ अध्यापनाची कौशल्ये आहेत.

(1) अभिरूप अध्यापन (2) अभिक्रमित अध्यापन

(3) क्रमान्वित अध्यापन (4) सूक्ष्म अध्यापन

---

**105.** शाळेचे निरीक्षण करणाऱ्या निरीक्षकाजवळ कोणती योग्यता असली पाहिजे?

(1) सर्वसाधारण पणे कमीतकमी तीन भाषांचे ज्ञान असावे.

(2) व्यवसायिक अनुभव/ज्ञान असावे.

(3) शैक्षणिक समस्या सोडविण्याची पात्रता असावी

(4) वरील सर्व

---

**106.** महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेचे मुख्यालय __________ येथे आहे.

(1) औरंगाबाद (2) मुंबई (3) पुणे (4) नागपूर

---



StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



**107.** महिला विकासासाठी तळमळीने कार्य करणाऱ्या महिला व संस्था यांना __________ हा पुरस्कार देण्यात येतो.

(1) सावित्रीबाई फुले (2) अहिल्याबाई होळकर

(3) लक्ष्मीबाई टिळक (4) गोदावरी परूळेकर

---

**108.** SEZ (सेझ) हे कशाचे संक्षिप्त रूप आहे?

(1) विशेष कृषी क्षेत्र (2) विशेष पर्यटन क्षेत्र

(3) विशेष शिक्षक क्षेत्र (4) विशेष आर्थिक क्षेत्र

---

**109.** भारताचे नियोजन मंडळ हे __________ आहे.

(1) घटनात्मक समिती (2) कायदेशीर समिती

(3) स्वतंत्र व स्वायत्त समिती (4) सल्लागार समिती

---

**110.** लोकसंख्या शिक्षणामध्ये खालीलपैकी कोणत्या गोष्टींचा समावेश होतो.

(1) लोकसंख्या परिवर्तन

(2) लोकसंख्येची रचना व महत्त्व

(3) औद्योगिक प्रगती व लोकसंख्या यांचा संबंध

(4) वरीलपैकी सर्व

---

**111.** मुलांच्या शाळेत मुलींना प्रवेश देताना शाळेच्या व्यवस्थापकांनी मुलींकरिता कोणती व्यवस्था करणे आवश्यक आहे?

(1) किमान पाच महिला शिक्षिकांची नेमणूक.

(2) स्वतंत्र प्रसाधनगृह व विश्रामकक्ष.

(3) स्वतंत्र वर्गखोल्या व वसतीगृहाची सोय.

(4) शारीरिक शिक्षण व मार्गदर्शनाची व्यवस्था.

---

**112.** __________ या मानसशास्त्रज्ञाने क्रमान्वित अध्ययन पद्धती शोधून काढली.

(1) स्किनर (2) पॉव्हलॉव्ह (3) थार्नडाईक (4) टर्मन

---

**113.** शारीरिक शिक्षण कोणत्या स्तरावर दिले जावे?

(1) प्राथमिक स्तर (2) माध्यमिक स्तर

(3) महाविद्यालयीन स्तर (4) वरील सर्व

---

**114.** 'दूधाचा महापूर योजना' खालीलपैकी कोणत्या वर्षापासून सुरु झाली?

(1) 1971 (2) 1972 (3) 1973 (4) 1974

---

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



**115.** एका सांकेतिक भाषेत FLOWER हा शब्द IORZHU असा लिहिला तर त्या भाषेत SAND हा शब्द कसा लिहाल ?

(1) TCQI (2) TCQG (3) VDQP (4) VDQG

---

**116.** किती डेसीबल आवाजाची तीव्रता असतांना मनुष्य बहिरा होतो.

(1) 55 डेसीबल (2) 75 डेसीबल (3) 100 डेसीबल (4) 12 डेसीबल

---

**117.** 'शिक्षण साहित्य व पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी एक स्वतंत्र संस्था असावी' अशी शिफारस कोणी केली होती ?

(1) मुदलीयार शिक्षण आयोग (2) डॉ. राधाकृष्णन आयोग

(3) कोठारी शिक्षण आयोग (4) हंटर आयोग

---

**118.** भूगोल अध्ययनात खगोलाचा अभ्यास करीत असतांना खालीलपैकी कोणत्या घटकांचा अभ्यास आपण करतो ?

(1) मृदावरण, शिलावरण, जलावरण, सागर

(2) विश्व, ग्रहणे, आकाशगंगा, तारे, ग्रह

(3) हिमनदी, वाऱ्याचे कार्य, भूकंप, विदारण

(4) साधन संपत्ती, व्यवसाय, हवामान, जीवावरण

---

**119.** महाराष्ट्रात 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव' ही मोहिम केव्हा सुरु झाली ?

(1) 26 जानेवारी 2007 (2) 15 ऑगस्ट 2007

(3) 26 जानेवारी 2008 (4) 1 मे 2008

---

**120.** नैतिक मूल्य म्हणजे काय ?

(1) एखाद्या वस्तूची किंमत ठरविणे.

(2) व्यक्तीची समाजातील प्रतिष्ठा

(3) इतरांशी योग्य रीतीने वर्तन करण्यास मदत करणे

(4) दोन वस्तूंच्या किंमतीत केलेली तुलना

---

**121.** घनदाट अंधकारातही घुबड समोरील वस्तु स्पष्टपणे बघू शकतो; कारण :

(1) त्याचे डोळे मिचमिचणारे असतात.

(2) भुवया आत असणारे मोठे डोळे त्याला असतात.

(3) त्याच्या डोळ्यात निसर्गत:च प्रकाश बल्ब असतात.

(4) या पैकी नाही.

---



StudySite.org
StudySite.org

StudySite.org StudySite.org



122. हरित क्रांतीचे वैशिष्ट हे आहे.

(1) कृषी व्यवसायाचे यांत्रिकीकरण (2) कर्जाची सोय

(3) शेती संशोधन (4) वरील सर्व

123. राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेची स्थापना __________ मध्ये करण्यात आली.

(1) इ.स. 1970 (2) इ.स. 1974 (3) इ.स. 1982 (4) इ.स. 1972

124. 'इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार 2005' हा 2006 साली __________ यांना मिळाला.

(1) शबाना आझमी (2) जावेद अख्खत्तर (3) निर्मला देशपांडे (4) देवी चेरिअन

125. महाविद्यालयामध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा प्रकार कोणता?

(1) सहज शिक्षण (2) अनौपचारिक शिक्षण

(3) औपचारिक शिक्षण (4) यापैकी कोणतेही नाही

126. प्रौढ शिक्षण ही योजना का राबवितात?

(1) सर्वांना साक्षर करण्यासाठी.

(2) सर्वांना शहाणे करण्यासाठी.

(3) गुणात्मक लोकसंख्या तयार करण्यासाठी.

(4) निरक्षरतेचे उच्चाटन करण्यासाठी.

127. __________ पर्यवेक्षण सर्वात जास्त चांगले समजले जाते.

(1) सृजनात्मक (2) प्रतिबंधात्मक (3) दुरुस्तीभिमुख (4) निरोधात्मक

128. राष्ट्रीय प्रौढशिक्षण कार्यक्रमात __________ या वयोगटातील लोकांना साक्षर बनविणे, हा उद्देश होता.

(1) 15 ते 50 (2) 10 ते 35 (3) 15 ते 35 (4) 15 ते 65

129. $45 \times 7 \times 9 \times \frac{2}{10} = ?$

(1) 567 (2) 5670 (3) 56.70 (4) 5.670

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**130.** __________ ही कायम स्वरूपी नोंद वही आहे.

(1) आवक-जावक रजिष्टर (2) विद्यार्थी उपस्थिती रजिष्टर

(3) जनरल रजिष्टर (4) कन्टिन्जेन्सी रजिष्टर

---

**131.** एका सांकेतिक भाषेत जीवनरथ हा शब्द 65387 व राजीवलोचन हा शब्द 165243 असा लिहिल्यास नवथर हा शब्द कसा लिहावा ?

(1) 3578 (2) 3875 (3) 5387 (4) 3567

---

**132.** संपादित ज्ञानाचे उपयोजन करण्याची क्षमता खालीलपैकी कोणत्या स्तंभातून स्पष्ट होते ?

(1) लर्निंग टू नो (2) लर्निंग टू डू

(3) लर्निंग टू लिव्ह टुगेदर (4) लर्निंग टू बी

---

**133.** महाराष्ट्राचे उच्च न्यायालय मुंबई येथे आहे, तर नागपूर, औरंगाबाद येथे त्यांचे काय आहे ?

(1) कनिष्ठ न्यायालय (2) वरिष्ठ न्यायालय

(3) खंडपीठे (4) यापैकी कोणतेही नाही

---

**134.** खाजगी शाळेत शाळेतील शिक्षक समिती/मुख्याध्यापकाचा प्रभाव शिक्षण निरीक्षकांवर पडतो.

(1) हा निरीक्षणातील दोष आहे. (2) हा निरीक्षणातील गुण आहे.

(3) हे व्यवहारिक आहे. (4) हा नियम आहे.

---

**135.** इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांजवळ कोणता गुण सर्वाधिक महत्त्वाचा वाटतो ?

(1) कथनशैलीवर प्रभुत्त्व (2) स्पष्टीकरणावर प्रभुत्त्व

(3) भाषेवर प्रभुत्त्व (4) 1 आणि 2

---

**136.** 3, 8, 15, 24, 35, **?**

वरील मालिकेत संख्याची एक श्रेणी दिलेली आहे. ही श्रेणी कोणत्या तरी नियमानुसार तयार करण्यात आली आहे. हा नियम ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ते दिलेल्या पर्यायांमधून निश्चित करा.

(1) 47 (2) 49 (3) 48 (4) 63

---

**137.** भारतामध्ये जास्तीत जास्त काम करणारे लोक __________ आहेत.

(1) प्राथमिक क्षेत्रात (2) द्वितीय क्षेत्रात

(3) तृतीय क्षेत्रात (4) यापैकी कोणतेही नाही

---

StudySite.org



StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**138.** ''विद्यार्थ्यांची सौंदर्य अभिरूची व रसग्रहण क्षमता विकसित करणेस''
हे उद्दिष्ट भाषेच्या कोणत्या पाठासाठी वापरतो ?

(1) गद्यपाठ (2) व्याकरण पाठ (3) सृजनात्मक पाठ (4) पद्यपाठ

---

**139.** भुईकोट किल्ला __________ या शहरात आहे.

(1) सिंधुदुर्ग (2) सोलापूर (3) रत्नागिरी (4) चंद्रपूर

---

**140.** शैक्षणिक स्तरावर उत्कृष्ट ग्रंथालय सेवा आवश्यक आहे कारण त्यामुळे __________ .

(1) विद्यार्थ्यास बहुश्रुत होण्यास मदत होते (2) विद्यार्थ्यांना विषयात चांगले गुण मिळतात

(3) शिक्षकांचे शिकविण्याचे श्रम वाचतात (4) पालक व विद्यार्थ्यांना फायदा होतो

---

**141.** एका सांकेतिक भाषेत STRAIN हा शब्द UWTDKQ असा लिहितात. तर PLACES हा शब्द कसा लिहावा ?

(1) RNDFGV (2) ROCFHV (3) RODEGV (4) ROCFGV

---

**142.** संकल्पना प्राप्ती प्रतिमान __________ यांनी मांडले.

(1) ब्रूनर (2) आसूबेल (3) स्किनर (4) थॉर्नडाईक





---

**143.** ग्रामपंचायतीचा सचिव कोण असतो ?

(1) ग्रामसेवक (2) तलाठी (3) सरपंच (4) पोलिसपाटील

---

**144.** पुढील तीन घटकांमधील संबंध दाखविणाऱ्या योग्य आकृतीची निवड करा.
मुंबई, सातारा, महाराष्ट्र

(1)  (2)  (3)  (4) 

---

**145.** 1946 साली पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांना प्रवेशासाठी खुले करावे या मागणीसाठी बोर्डी येथे कोणी उपोषण सुरू केले ?

(1) सेनापती बापट (2) साने गुरुजी (3) केशवराव जेधे (4) शंकरराव देव

---

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org



**146.** शेखरला इंग्रजीत $\frac{17}{100}$ गुण मिळाले असे शिक्षक म्हणतात तेव्हा हे मूल्यमापनाचे कोणते तंत्र आहे?

(1) निरीक्षणात्मक तंत्र (2) परीक्षा तंत्र

(3) संख्यात्मक तंत्र (4) गुणात्मक तंत्र

---

**147.** भारतीय राज्यघटनेची गुरुकिल्ली कोणती?

(1) मार्गदर्शक तत्वे (2) सरनामा (3) कलमे (4) परिशिष्टे

---

**148.** स्थलांतरित शेतीला कोणत्या प्रदेशात 'झूम' म्हणतात.

(1) नागालँड (2) आंध्र प्रदेश (3) मध्य प्रदेश (4) पश्चिम घाट

---

**149.** शाळा निरीक्षण ही __________ प्रक्रिया आहे.

(1) अल्पकालीन (2) दीर्घकालीन (3) दैनंदिन (4) खाजगी

---

**150.** शैक्षणिक उद्दिष्टांचे श्रेणीबद्ध वर्गीकरणानुसार भावनिक विकासात खालीलपैकी कोणत्या उद्दिष्टांचा समावेश आहे?

(1) ज्ञान → आकलन → उपयोजन → पृथक्करण → संश्लेषण → मूल्यमापन

(2) अवधान → प्रतिसाद → मूल्यनिर्णय → संघटन → मूल्यसमूह

(3) अवधान → अनुकरण → प्रतिसाद → मूल्यनिर्णय → अचुकता → मूल्यसमूह

(4) अनुकरण → क्रियाकौशल्य → अचुकता → संधीकरण → स्वाभाविकरण

---

- o O o -

P.T.O.

StudySite.org StudySite.org

StudySite.org
StudySite.org



कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org

StudySite.org
StudySite.org